# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**तक्रार क्र. : ०५/२०१८/नाशिक**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. एकबाल नजीर अन्सारी,<br>रा.८००/५०, किल्ला रविवार वार्ड,<br>मालेगांव, ता.मालेगांव, जि.नाशिक. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा,<br>वरिष्ठ लिपीक (आरोग्य विभाग),<br>मालेगांव महानगरपालिका मालेगांव,<br>ता.मालेगांव, जि.नाशिक. | : | प्रतिवादी |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी तथा,<br>आरोग्य अधिकारी,<br>मालेगांव महानगरपालिका मालेगांव,<br>ता.मालेगांव, जि.नाशिक. | : | प्रतिवादी |

**सुनावणी दिनांक - ०८/०५/२०१९**

तक्रारदार यांनी दिनांक २८/०५/२०१८ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक ०८/०५/२०१९ रोजी सुनावणीसाठी तक्रारदार अनुपस्थित होते. तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित होते. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते.

तक्रारदार यांनी त्यांच्या दिनांक २८/०५/२०१८ रोजीच्या तक्रार अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक ०२/०२/२०१५ रोजीच्या माहिती अर्जासंदर्भात आयोगाने द्वितीय अपील क्रमांक २७७३/२०१५/नाशिक वरील निर्णय दिनांक २६/०९/२०१७ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. "विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस दिनांक ०२/०२/२०१५ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी. " तथापि, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशानुसार कार्यवाही केली नसल्याचे तक्रारदार यांनी सदर तक्रार अर्जात नमूद केले आहे.

सुनावणी दरम्यान तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांच्या द्वितीय अपील क्रमांक २७७३/२०१५/नाशिक संदर्भात दिनांक २६/०९/२०१७ रोजी दिलेल्या आदेशानुसार अपिलार्थीस दिनांक

१५/०२/२०१५ रोजी व पुन्हा दिनांक ०६/०३/२०१८ रोजी माहिती पुरविली आहे. त्याबाबतची स्थळप्रत आयोगास सादर करीत आहे.

सुनावणी दरम्यानचा युक्तीवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, तक्रारदार यांच्या दिनांक २८/०५/२०१८ रोजीच्या तक्रारीच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमुद केल्याप्रमाणे आयोगाच्या आदेशानुसार कार्यवाही केली आहे. म्हणून प्रस्तुत तक्रारीत काहीही तथ्य नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

तक्रार क्रमांक ०५/२०१८/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

**(के.एल.बिश्नोई)**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

क्र.रामाआ- नाशिक/तक्रार क्र.०५/२०१८/नाशिक/ओ २२४२ दिनांक 11 JUN 2019